नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४००० ०२१.

दूरध्वनी : ०२२-२२०४४९५२/२२०४५७०६ फॅक्स: २२८८६६६६

ई-मेल: clmms@yahoo.in; dclmms@yahoo.in ;

dclmms_complaints@yahoo.com

अ१


क्र. वैमाशा- १४/वमातोमा/पडताळणी/२०१५/ १०२५ दिनांक- २६फेब्रूवारी, २०१५

# परिपत्रक

विषय:- वजन माप, तोलन मापन उपकरणांच्या पडताळणीबाबत.

वैध मापन शास्त्र यंत्रणेच्या तरतुदीनुसार वजन व मापाची पडताळणी निर्धारीत केलेल्या वेळेनुसार केली जात असते. सदरचे शासकीय शुल्क सरकारी कोषागारात जमा करण्यासाठी वैध मापन शास्त्र, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शासकीय अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. मात्र काही काळा पासून सदरचे शासकीय शुल्क व्यापारी लोक प्राधिकृत शासकीय अधिकारी यांना न देता मध्यस्थांमार्फत (दुरुस्तक) यांच्याकडून जमा करण्याची प्रथा सुरु झाली आहे. सदरच्या प्रथेमुळे शासकीय शुल्क गोळा करण्याच्या नावावर दुप्पट किंवा तिप्पट रक्कम मध्यस्थांकडून गोळा केली जाते आणि त्यामुळे शासनाची व या यंत्रणेची प्रतिमा मलिन होते. सदरच्या बेकायदेशीर प्रथेमध्ये व्यापारी लोकांना सहभागी होणे अयोग्य व बेकायदेशीर आहे.

या व्दारे सर्व व्यापारी संघटना यांचे वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ च्या तरतुदीकडे लक्ष वेधण्यात येत आहे. सदर तरतुदीनुसार खालीलप्रमाणे जबाबदारी निर्देशित करण्यात आली आहे.

१. वैध मापन शास्त्र अधिनियमातील,२००९ चे कलम २४ मधील तरतुदीप्रमाणे आणि वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११ च्या नियम २७ मधील तरतुदीप्रमाणे वजन माप उपयोगकर्त्यांना त्यांचेकडील वजन मापे उपकरणे स्वत: पडताळणी व मुद्रांकन करुन घेण्याची जबाबदारी आहे.

२. महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम,२०११ च्या नियम १५ मधील तरतुदीप्रमाणे पडताळणी व फेर मुद्रांकन शुल्क विहित केलेले आहे. (त्याची प्रत या सोबत जोडण्यात आली आहे.)

३. सदरचे शुल्क गोळा करण्याची सर्व जबाबदारी नियमाप्रमाणे वैध मापन शास्त्र यंत्रणेतील निरीक्षकांची आहे आणि त्यात कुठल्याही मध्यस्थाचा उल्लेख नाही.

वरील सुचनाचे काटेकोरपणे पालन करणे सर्व उपयोगकर्ते यांना बंधनकारक आहे त्याचे उल्लंघन झाल्यास वैध मापन शास्त्र नियमाखाली कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व व्यापारी संघटना
२. सर्व बाजार समिती
३. महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज
४. शुगर मर्चंट असोसिएशन
५. मुंबई ग्राहक पंचायत